/

**वाचा :- १) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.रा.भु.अ.आ.का-४/ युनिकोड रुपांतरण /प्र.क्र.१५/२०१२ दिनांक १५/०३/२०१३**

**२) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.रा.भु.अ.आ.का-४/प्र.क्र.१६/ डेटा दुरुस्ती आज्ञावली /१३ पुणे दिनांक २०/०५/२०१३**

**३) मा. अपर मुख्य सचिव,(महसूल) यांचेकडील अशाप क्र. संकीर्ण -२०१३ /प्र.क्र २२३/ल-१ दिनांक १७/१२/२०१३**

क्रमांक.रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क्र.३६ /२०१४
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि,
अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालय,
पुणे दिनांक :- १३ /२/२०१४

# परिपत्रक

**विषय:- ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींचे संपुर्ण राज्यात अंमलबजावणी काम पुर्ण झालेला अहवाल पडताळणी सूची**

ई-महाभूमि तथा राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकिकरण कार्यक्रमांतर्गत ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींची अंमलबजवणी संपुर्ण राज्यामध्ये दिनांक २८/०२/२०१४ पासुन करावयाची आहे. त्यासाठीचे पुर्वतयारीबाबत या कार्यालयाकडील संदर्भ क्र. २ व ३ चे परिपत्रकानुसार सविस्तर सुचना देणेत आल्या आहेत. त्यानुसार सर्व जिल्हयात काम प्रगतीपथावर आहे. सदर सूचनांप्रमाणे सर्व डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट यांनी उर्वरीत काम मूदतीत पुर्ण होईल याची दक्षता घेणेची आहे.तसेच ज्या तालुक्यांचा संदर्भ क्र. २ व ३ मध्ये नमूद परिपत्रकाप्रमाणे कामे पुर्ण झाली आहेत. त्या तालुक्यातील तहसिलदारांनी सोबतचे तपासणी सूची नुसार झालेल्या कामाची खात्री करुन घ्यावी व त्या नंतर त्या तहसिलमध्ये आज्ञावली प्रत्यक्ष वापरपुर्वीची चाचणी तपासणी ( Hands on Training ) करुन त्यानंतरच स्टेट डेटा सेंटरवर डेटा स्थापीत करणेची कार्यवाही करावयाची आहे.

**<u>तपासणी सूची :-</u>**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | संबंधीत तालुक्यात डाटा दुरुस्ती व अपडेशन साठी विविध आज्ञावलींच्या अदयावत आवृतींचा ( Version १.२ ) वापर करण्यात आला आहे काय ? |
| २ | आज्ञावलीतील विविध मॉडयुल वापर करताना वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील |

| | |
|---|---|
| | सूचनाचे व राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे कडील तांत्रिक सूचनाचे पालन केले आहे काय ? |
| ३ | तालुक्यातील सर्व गांवाचा डेटा युनीकोड मध्ये रुपांतरीत केलेला आहे काय ? |
| ४ | तालुक्यातील सर्व गावांचे रेकॉर्डचे डाटा क्लीनिंग केले आहे काय ? |
| ५ | डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट / डिबीए /म्युटेशन सेल / मंडल अधिकारी / तलाठी या सर्वांचे आज्ञावलीत रजिस्ट्रेशन केले आहे काय ?<br>रजिस्ट्रेशन मध्ये तलाठी व मंडल अधिकारी यांच्या विहीत केलेल्या सही व बोटाचे ठसे घेतले आहे काय ? |
| ६ | डाटा करेक्शन मॉडयुल मध्ये अहवाल क्र. १ ते ५,७,१० ते १५ निरंक केले आहे काय ? |
| ७ | डाटा एंट्री ऑपरेटर यांनी केलेले बदल तलाठी यांनी प्रमाणीत केले आहे काय ? |
| ८ | तालुका समरी अहवाल ( Taluka Summary Report )निरंक झालेची खात्री केली आहे काय ? |
| ९ | सर्व गावाच्या प्रलंबीत फेरफार नोंदी डाटा अपडेशन मोडयुल वापरुन अद्यावत केल्या आहेत काय ? |
| १० | सर्व गट नंबर / सर्व्हेनंबर च्या ७/१२ च्या पीडीएफ प्रिन्ट काढून तपासणी अंती बरोबर आढळुन आल्या आहेत काय ? |
| ११ | विहीत परिमाणानुसार तपासणी ( तलाठी / मंडल अधिकारी / तहसिलदार / उपविभागीय अधिकारी / जिल्हाधिकारी ) यांनी केली आहे काय ?<br>तपासणी बाबत प्रमाणपत्र घेतले आहे काय ? |
| १२ | डिबीए टुल वापरुन सर्व डाटा अदययावत करुन ई-फेरफार सुरु करण्याच्या स्तरापर्यंत आणला आहे काय ? |
| १३ | LMIS मध्ये आढळून न आलेले सर्व ७/१२ डाटा अपडेशन मोडयुलमध्ये भरुन हस्तलिखीत ७/१२ शी मेळात आणले आहे काय ? |
| १४ | संगणकीकृत व हस्तलिखीत ७/१२ वरील खाते क्रमांक, धारकाचे नाव, स.न./ ग.नं. क्षेत्र, फेरफार क्र. इत्यादी तपशिल मेळात असलेची खात्री केली आहे काय ? |
| १५ | सन २००२ ते २०१३ पर्यंतचे सर्व हंगामाचे सर्व गावांचे क्रॉप अपडेशन चे काम पुर्ण केले आहे काय ? |

D:\रा.भु.अ.आ.का\परिपत्रक\तपासणी सुची प्र.क ३६.odt२

| | |
|---|---|
| १६ | म्युटेशन सेल साठी पुर्ण वेळ कर्मचा-याची नियुंक्ती केली आहे काय ? |
| १७ | सर्व तलाठी / मंडल अधिकारी / म्युटेशन सेल मधील कर्मचा-यांच्या डिजीटल सिग्नेचर प्राप्त करुन घेवून डाऊनलोड ( install ) केल्या आहेत काय ? |
| १८ | DB -२, LMIS डाटा बॅकअप सीडी डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट / जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी / जिल्हाधिकारी यांचे कडे पाठविली काय ? |
| १९ | तालुक्याचा अंतीम डाटाबेस डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट /जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांचेकडे दिलेला आहे काय ? |
| २० | आज्ञावली प्रत्यक्ष वापरापुर्वीची तपासणी ( Hands on Training ) सर्व फेरफार प्रकारासाठी करुन आज्ञावली वापरण्यासाठी योग्य असलेची खात्री केली आहे काय ? |

**टिप :- वरील १ ते २० मुदयांची उत्तरे होकारार्थी असणे आवश्यक आहे.**

१३/२/१८

**( गिरीश राव )**
**उपसंचालक भुमि अभिलेख सलग्न**
**जमाबंदी आयुक्त (रा.भु.अ.आ.का.)पुणे.**

**स्थळ प्रतिवर मा. जमाबंदी आयुक्त**
**आणि संचालक भुमि अभिलेख (म.राज्य) पुणे**
**यांची स्वाक्षरी असे .**

प्रत : अपर मुख्य सचिव महसूल, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : वरीष्ठ तांत्रिक संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.